# मुंबई विद्यापीठ

स्मरणपत्र
अतितात्काळ

परिपत्रक क्र. सीटीएयु/ २० /२०२०–२०२१

## परिपत्रक:

विषय:— महाविद्यालयात स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र स्थापन करणे आणि समन्वयक नियुक्त करण्याबाबत.

संदर्भ:— शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे क्र. उशिसं/२०२०/स्पर्धापरिक्षा/प्रशा—३/७६५६ दिनांक १७ नोव्हेंबर, २०२० रोजीचे पत्र.

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयांचे अवलोकन करावे व त्याअनुषंगाने मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयात स्पर्धा परिक्षा मार्गदर्शक केंद्र स्थापन करणे आणि समन्वयक नियुक्त करण्याबाबत आपल्याला सूचित करण्यात येत आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणा—या प्रशासकिय सेवापूर्व परिक्षेमध्ये महाराष्ट्रतील मुलांचे प्रमाणे वाढावे यासाठी महाराष्ट्र शासन संपूर्ण राज्यात सर्वोतोपरी प्रयत्न करीत असून पूर्ण राज्यात अशी ०६ भारतीय प्रशासकीय सेवापूर्व परिक्षा प्रशिक्षण केंद्रे शासनाने सुरू केलेली आहेत. यात संबंधित विषयाच्या तज्ञांकडून प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येते. सदर प्रशिक्षण केंद्रामधून दरवर्षी सुमारे ५४० मुलांना विनामुल्य प्रशिक्षण देण्यात येते, शिवाय त्यांना मासिक खर्चासाठी दरमहा शिष्यवृत्ती हि दिली जाते. मागील काही वर्षातील अनुभव पाहता सदर केंद्रामध्ये प्रवेश मिळविण्यासाठी परिक्षा देणा—या मुलांची संख्या वाढली आहे परंतू किमान गुणही अनेक मुले मिळवू शकत नाही असे दिसून येते, यासदर्भात मुलांना उचित मार्गदर्शन मिळणे अत्यंत आवश्यक आहे.

महाराष्ट्रात असणा—या भारतीय प्रशासकीय सेवापूर्व केंद्राची माहिती विद्यार्थ्यांना देणे, केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणा—या परिक्षांची माहिती विद्यार्थ्यांना देणे, महाराष्ट्रात लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणा—या परिक्षांची माहिती विद्यार्थ्यांना देणे, सदर परिक्षेसाठी त्यांना प्रोत्साहित करणे, जास्तीत जास्त मुलांकडून फॉर्म भरला जाईल यासाठी पाठपुरावा करणे, भारतीय प्रशासकीय सेवा परिक्षेची तयारी करण्यासाठी योग्य मार्गदर्शन करणे, शासनाद्वारे स्थापन केलेल्या परिक्षा केंद्रामध्ये प्रवेश परिक्षेसाठी मार्गदर्शन करणे, इ. सर्वे कामे करणेसाठी नव्याने सेवेत आलेल्या व योग्य मार्गदर्शन करू शकणा—या सहायक प्राध्यपकांची समन्वयक म्हणून नेमणूक करावी, जेणेकरून त्यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना अनेक वर्षे मिळू शकेल नेमणूक आदेशाची प्रत विभागीय सहसंचालक कार्यालय तसेच विद्यापीठाचे कुलसचिव यांना देण्यात यावी.

२/—

उपरोक्त बाबतीत मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शैक्षणिक संस्थांकडून काटेकोरपणे पालन करण्यात यावे व याबाबत मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका महाविद्यालयांचे प्राचार्यांनी वरील दिलेल्या सुचनांचे पालन करावे व त्यांचा अहवाल, शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांना कळविण्यात यावा.

(डॉ बळीराम गायकवाड)
प्र. कुलसचिव

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक.

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीकरिता रवानाः—**

१.कुलगूरूंचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई— ४०० ०३२
२. स्वीय सहाय्यक, प्र—कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई— ४०० ०३२
३.स्वीय सहाय्यक, कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई— ४०० ०३२

मुंबई :— ४०० ०३२
दिनांक :— ४.२.२०२१

(डॉ बळीराम गायकवाड)
प्रभारी कुलसचिव
मुंबई विद्यापीठ